| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | :- | २०.१०.२०२० |
| नोंदणी दिनांक | :- | २०.१०.२०२० |
| निकाल दिनांक | :- | २९.०४.२०२६ |
| कालावधी | :- | वर्ष महिने दिवस<br>०५ ०६ ०९ |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी अक्कलकोट, जि. सोलापूर यांचे न्यायालयात.**
**(पिठासीन अधिकारी - श्री. एम.एम. कल्याणकर)**

| | |
|---|---|
| CNR No. MHSO150014052020 | (जाहीर दिनांक - २९.०४.२०२६)<br>**नियमित फौजदारी खटला क्र.३०१/२०२०.**<br>CNR No. MHSO150014052020<br>**निशाणी क्र.२३** |
| **गुन्ह्याचा तपशिल** | पोलीस ठाणे, अक्कलकोट दक्षिण, गुन्हा क्र.५४०/२०१९, भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२७, ३२३, ५०४, ५०६ सह वाचन कलम ३४ प्रमाणे. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, अक्कलकोट दक्षिण. |
| **अभियोगपक्षातर्फे** | **श्रीमती.कांबळे, विद्यमान सहा. सरकारी अभियोक्ता.** |
| **आरोपी** | १. **मल्लीनाथ शिवलिंगप्पा धानशेट्टी**<br>वय : ४५ वर्ष, धंदा : मजूरी<br>२. **बसवराज सायबण्णा हणमगौडा उर्फ जेऊरे (मयत)**<br>३. **बसवराज इरण्णा धानशेट्टी**<br>वय : ३२ वर्ष, धंदा : खाजगी नोकरी<br>सर्व राहणार - नागणसूर,<br>ता. अक्कलकोट, जि. सोलापूर |
| **आरोपीतर्फे** | **अधिवक्ता श्रीमती.आर.एम.भासगी** |

**भाग - ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०७.१२.२०१९ व ०८.१२.२०१९ |
| गुन्हा नोंदविण्याची तारीख | १४.१२.२०१९ |
| अंतिम अहवाल दाखल करण्याची तारीख | २०.१०.२०२० |
| दोषारोप ठेवण्याची तारीख | १३.०३.२०२६ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु होण्याची तारीख | २३.०३.२०२६ |
| निकाल सुरक्षित ठेवण्याची तारीख | २९.०४.२०२६ |
| निकाल घोषीत करण्याची तारीख | २९.०४.२०२६ |
| शिक्षा करण्याची तारीख, असल्यास | -- |

## आरोपींचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नांव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | निर्दोष अथवा दोषी | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे तुरुंगात काढलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मल्लीनाथ शिवलिंगप्पा धानशेट्टी** | ०३.०१.२० | ०३.०१.२० | भा.दं.वि. कलम ३२३, ३२७, ५०६ सह वाचन कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| २. | **बसवराज सायबण्णा हणमगौडा उर्फ जेऊरे (मयत)** | ०३.०१.२० | ०३.०१.२० | भा.दं.वि. कलम ३२३, ३२७, ५०६ सह वाचन कलम ३४ प्रमाणे | अबेट | -- | -- |
| ३. | **बसवराज इरण्णा धानशेट्टी** | ०३.०१.२० | ०३.०१.२० | भा.दं.वि. कलम ३२३, ३२७, ५०६ सह वाचन कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | -- | -- |

## भाग - क
## अभियोग पक्ष/बचाव पक्ष /न्यायालयाद्वारे तपासलेले साक्षीदार

### अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक १ | इरण्णा राजप्पा धनशेट्टी | फिर्यादी | १९ |
| साक्षीदार क्रमांक २ | राचप्पा शरणप्पा धनशेट्टी | साक्षीदार | २२ |

### ब. बचाव पक्ष

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | काही नाही | - |

क. न्यायालयीन साक्ष

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | काही नाही | - |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष /न्यायालयाद्वारे देण्यात आलेले निशाणी क्रमांक**

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | २० | फिर्यादिवरील सहीपुरते |
| २ | १८ | तडजोड पुरसीस |
| ३ | २१ | फिर्यादीतर्फे पुढील पुरावा न देण्याबाबतची पुरसीस |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| - | काही नाही | - |

क. न्यायालयीन साक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| - | काही नाही | - |

ड. वस्तु/मुद्देमाल

| क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| - | - | - |

## न्या य नि र्ण य

(घोषीत दिनांक २९ माहे एप्रिल सन २०२६)

सदरचा खटला आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२७, ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवून चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे असे की, फिर्यादी इरण्णा राचप्पा धानशेट्टी हा नागणसूर, ता.अक्कलकोट येथे कुटूंबियांसह राहण्यास असून तो शेती व पापड विक्रीचा व्यवसाय करतो. फिर्यादीचे वडीलांना बसवराज व हणमंत असे दोन भाऊ असून ते विभक्तपणे राहतात व त्यांना फिर्यादीचे आजोबा शरणप्पा यांचेकडून हिश्याप्रमाणे घरजागा मिळाली होती. फिर्यादीच्या वडीलांच्या हिश्याची घरजागा फिर्यादीच्या वडीलांनी घरगुती अडचणींमुळे चुलतभाऊ शिवलिंगप्पा धानशेट्टी यांना दोन वर्षापूर्वी रक्कम रु.०६,००,०००/- किंमतीस रितसर खरेदी दिले होते. त्यापैकी उर्वरित रक्कम रु.१६,०००/- त्यांना येणे बाकी होते.

०३. दिनांक ०७.१२.२०१९ रोजी सकाळी ०९.०० वाजताचे सुमारास फिर्यादीचे वडील राचप्पा यांनी शिवलिंगप्पा धानशेट्टी यांना बाजारपेठ गाठून घरविक्रीतून राहिलेले १६,०००/- रुपयांबाबत विचारणा केली असता त्यावेळी आरोपी क्र.१ हा त्या ठिकाणी येऊन फिर्यादीच्या वडीलांशी हुज्जत घालून 'तुझे कसले पैसे दयायचे' असे म्हणून दमदाटी करुन हाताने मारहाण केली. या घटनेची माहिती फिर्यादीचा चुलता हणमंत याने फिर्यादीस सांगितल्यावर सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास फिर्यादी हा गावातील शिवलिला टी हाऊस येथे आरोपी क्र.१ यास विचारणा करण्यासाठी गेला व आरोपी क्र.१ यास 'आमचे पैसे देणे असताना उलट माझे वडीलांना का मारला' अशी विचारणा केली असता आरोपी क्र.१ व २ यांनी मिळून 'तू कोण रे विचारणारा' असे म्हणून शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी हा तक्रार देण्यासाठी अक्कलकोट येथे गेला असता फिर्यादीचे ओळखीचे बसवराज मंटगी, बसवराज धानशेट्टी, कांतु धानशेट्टी, शशी खिलारे वगैरे लोकांनी फिर्यादीस समजावून गावात मिटवून घेऊ असे सांगितले व संध्याकाळी गावातील प्रतिष्ठीत मंडळीत पैशाचा व्यवहार निकालात काढून तडजोड केली.

०४. दिनांक ०८.१२.२०१९ रोजी दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास फिर्यादी हा त्याची मोटरसायकल क्र.एम.एच.१३/बीजे-७१९८ वरुन नेहमी प्रमाणे पापड विक्री करुन विक्री

केलेले पैसे व पापडाचे टोपले वडीलांकडे देऊन तो राहत असलेल्या घराकडे जात असताना हैद्राकडे जाणाऱ्या व्हसूर रोडच्या फाटयाजवळ येताना फिर्यादीचे पाठोपाठ आरोपी क्र.२ हा त्याच्या मोटरसायकलवरुन आल्याने फिर्यादीने त्याला का आला अशी विचारणा केली असता तो काहीही न बोलता निघून गेला आणि म्हणून तो आरोपी क्र.२ याचे घरी विचारणा करण्यासाठी गेला असता आरोपी क्र.२ च्या आईने आरडाओरडा करत आरोपींना फोन केला. त्यानंतर आरोपी हे त्या ठिकाणी आले व आरोपी क्र.१ ने त्याच्याकडील मोटरसायकल फिर्यादीच्या अंगावर घालून सोबत आलेल्या दोन इसमांनी फिर्यादीस मारहाण केली. त्यानंतर फिर्यादीचे वडील, काका व भाऊ हे भांडणाची सोडवासोडव करीत असताना त्यांना देखील आरोपींनी शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली व फिर्यादीच्या वडीलांच्या अंगावरील शर्टाचा खिसा फाडून त्यातील २२००/- रुपये काढून घेतले व फिर्यादीस जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादी तक्रार देण्यासाठी पोलीस ठाणे येथे गेला असता पोलीसांनी त्याला उपचारासाठी दवाखाना यादी दिली. त्यानंतर ग्रामिण रुग्णालय, अक्कलकोट येथील डॉक्टरांनी सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर येथे पुढील उपचाराकामी पाठविले. सोलापूर सिव्हील हॉस्पीटल येथे उपचार घेत असताना अक्कलकोट दक्षिण पोलीसांनी त्यांची फिर्याद नोंदवून घेतली.

**०५.** सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, अक्कलकोट दक्षिण यांनी आरोपींविरुद्ध अपराध क्र.५४०/२०१९, भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२७, ३२३, ५०४, ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. अपराधाचा तपास पो.ना./१६९१ श्री.व्ही.एन.उपासे यांनी केला व त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला, गुन्हयात वापरलेले वाहन जप्त केले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२७, ३२३, ५०४, ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र तयार करुन न्यायालयात दाखल केले.

**०६.** प्रस्तुत खटल्याच्या प्रलंबितावस्थेत आरोपी क्र.०२ हा मयत असल्याबाबत

मृत्युप्रमाणपत्र (निशाणी ०८) अभिलेखावर दाखल करण्यात आल्याने त्याचे विरुध्द खटला बंद करण्यात आला व आरोपी क्र.०१ व ०३ यांचे विरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२७, ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये नि.क्र.०८ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले. सदर दोषारोप आरोपी क्र.०१ व ०३ यांनी गुन्हा कबुल नाही असे त्यांचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र.०९ व १० प्रमाणे दिले. आरोपींविरुध्द अभिलेखपटलावर गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे त्यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अंतर्गत जबानी नाकारण्यात आली.

**०७.** प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थीत होतात त्यास खालील कारणांसह उत्तरे देण्यात येतात.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अभियोगपक्षाने असे सिद्ध केले आहे काय की, दिनांक ०७/१२/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वाजताच्या सुमारास मौजे नागणसूर, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर येथे आरोपी क्र.०१ ने मयत आरोपी क्र.०२ यांच्यासह समान उद्देशपूर्तीच्या हेतूने फिर्यादीचे वडील राचप्पा धानशेट्टी यांना हाताने इच्छापूर्वक मारहाण करुन इजा पोचविली व त्यानंतर सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास शिलवंती टी हाऊस, नागणसूर येथे आरोपी क्र.०१ ने मयत आरोपी क्र.०२ सह समान उद्देशपूर्तीच्या हेतूने फिर्यादीस हाताने मारहाण करुन इच्छापूर्वक इजा पोचविली तसेच दिनांक ०८/१२/२०१९ रोजी दुपारी ०२.०० वाजताच्या सुमारास मौजे नागणसूर, ता. अक्कलकोट, जि.सोलापूर येथील आरोपी क्र.०२ च्या घरासमोर आरोपी क्र.०१ व ०३ यांनी मयत आरोपी क्र.०२ याचेसह समान उद्देशपूर्तीच्या हेतूने फिर्यादी, फिर्यादीचे काका, वडील व भाऊ यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोचविली ? | **नकारार्थी.** |
| २. अभियोगपक्षाने असे सिद्ध केले आहे काय की, दिनांक ०८/१२/२०१९ रोजी दुपारी ०२.०० वाजताच्या | |

| | | |
|---|---|---|
| | सुमारास मौजे नागणसूर, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर येथील आरोपी क्र.०२ च्या घरासमोर आरोपी क्र.०१ व ०३ यांनी मयत आरोपी क्र.०२ याचेसह समान उद्देशपूर्तीच्या हेतूने फिर्यादीच्या वडीलांच्या अंगावरील शर्टचा खिसा फाडून त्यातील २२००/- रुपये जबरीने काढून घेण्यासाठी त्यांना इच्छापूर्वक दुखापत केली ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय की, वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्देशपूर्तीच्या हेतूने फिर्यादीस जिवे ठार मारण्याची धमकी देऊन धाकदपटशा केली ? | **नकारार्थी.** |
| ४. | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, आरोपींनी भा.दं.वि.कलम ३२३, ३२७, ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ५. | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>अभियोग पक्षाचा पुरावा</u>**

०८. साक्षीदार क्र.०१ इरण्णा धनशेट्टी यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, दिनांक ०८/१२/२०१९ रोजी त्याचेत व आरोपींमध्ये पैशाच्या कारणावरुन वाद झाला होता व त्याशिवाय अजून कोणतीही घटना घडली नाही. त्याला दाखविण्यात आलेल्या फिर्यादवरील सही (निशाणी २०) त्याची असून त्यातील मजकूर त्याला माहित नाही. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात फिर्यादीने मान्य केले आहे की, त्याने फिर्याद मधील मजकूर वाचून पाहिला नव्हता तसेच त्याचेत व आरोपींमध्ये तडजोड झाली असून त्याबाबत त्याने पुरसीस निशाणी १८ दाखल केली आहे व त्यातील मजकूर त्यास वाचून दाखविण्यात आला होता व तो खरा व बरोबर असल्याने त्याने त्यावर सही केली आहे. त्याची व आरोपींची तडजोड झाल्याने

त्याला पुढील पुरावा दयायचा नाही म्हणून त्याने पुरसीस (निशाणी २१) अभिलेखावर दाखल केली आहे तसेच आरोपी व त्याचेत कोणताही वाद शिल्लक राहिलेला नसून त्याला प्रस्तुतचे प्रकरण पुढे चालवायचे नाही.

**०९.** साक्षीदार क्र.०२ राचप्पा धनशेट्टी यांनी देखील त्यांच्या साक्षीत दिनांक ०८/१२/२०१९ रोजी काहीही झाले नव्हते व त्या दिवशी ते घरी होते असे सांगितले आहे. सदर साक्षीदाराने देखील आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याचा व आरोपींचा कोणताही वाद शिल्लक राहिलेला नाही व त्यांना प्रस्तुतचे प्रकरण पुढे चालवायचे नाही असे मान्य केले आहे. पुढे असेही मान्य केले आहे की, त्यांनी आरोपी व त्यांचेत तडजोड झाल्याबाबत पुरसीस निशाणी १८ अभिलेखावर दाखल केली असून त्यातील मजकूर त्यांना वाचून दाखविण्यात आला होता व तो बरोबर असल्याने त्यांनी त्यावर सही केली आहे.

**<u>मुद्दा क्र.०१ ते ०४ बाबत</u>** :-

**१०.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन करता त्याने दिनांक ०८/१२/२०१९ रोजी त्याचा व आरोपींचा पैशाच्या कारणावरुन वाद झाला होता व त्याशिवाय अजून कोणतीही घटना घडली नाही असे कथन केले आहे. साक्षीदार क्र.०२ ने देखील त्याच्या पुराव्यात दिनांक ०८/१२/२०१९ रोजी काहीही झाले नव्हते व त्या दिवशी तो घरी होता असे कथन केले आहे. एकंदरीत दोन्ही साक्षीदारांनी घटना नाकारल्याचे दिसते. तसेच अभिलेखाचे अवलोकन करता फिर्यादी व आरोपी क्र.०१ व ०३ यांनी त्यांचे न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याबाबत निशाणी १८ अन्वये संयुक्त तडजोड पुरसीस दाखल केल्याचे दिसून येते. एकंदरीत अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारास मारहाण केली, साक्षीदार राचप्पा याच्या अंगावरील शर्टचा खिसा फाडून त्यातील २२००/- रुपये जबरीने काढून घेण्यासाठी त्यांना इच्छापूर्वक दुखापत केली व फौजदारी धाकदपटशा केला या बाबी सबळ पुराव्यानिशी शाबीत झालेल्या नाहीत. त्यामुळे आरोपींविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही आणि त्यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे

सिध्द होऊ शकले नाही. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. करीता मुद्दा क्र.०१ ते ०४ हे 'नकारार्थी' नोंदविण्यात येतात.

**<u>मुद्दा क्र. ०५ बाबत</u> :-**

**११.** वरील चर्चेनुसार मुद्दा क्र.०१ ते ०४ हे नकारार्थी नोंदविले आहेत आणि आरोपींना संशयाचा फायदा देण्यात आला. करीता मुद्दा क्र.०५ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे :-

## आदेश

१. आरोपी क्र.१ मल्लीनाथ शिवलिंगप्पा धानशेट्टी व आरोपी क्र.३ बसवराज इरण्णा धानशेट्टी यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२३, ३२७, ५०६ सह वाचन कलम ३४ अन्वये ठेवलेल्या आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक आणि जामिन बंधपत्र हे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ चे पालन म्हणून पुढील सहा महिन्यांकरीता कायम ठेवण्यात येतात.

३. गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक टीव्हीएस कंपनीची स्पोर्टस ईएस मॉडेलची मोटरसायकल क्र.एम.एच.१३/बी.पी.९२१९ ही फौ.कि.अर्ज क्र.३०/२०२० मधील दिनांक १०/०२/२०२० रोजीच्या आदेशान्वये त्यातील अर्जदार मल्लीनाथ धानशेट्टी यास परत करण्यात आली असल्याने सदर आदेश अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

[न्यायनिर्णय हा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३ (१) अन्वये खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.]

MUKUL MUKUND KALYANKAR
Digitally signed by MUKUL MUKUND KALYANKAR
Date: 2026.04.29 13:06:11 +0530

**(एम.एम. कल्याणकर)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
अक्कलकोट.

दि. २९.०४.२०२६.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.S.Mitragotri (Grade-III). |
| Court | : | C.J.J.D. and J.M.F.C., Akkalkot. |
| Date | : | 29.04.2026 |
| Judgment / Order signed by P. O. on | : | 29.04.2026 |
| Judgment / Order uploaded on | : | 29.04.2026 |